# महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांची मीमांसा

**सौ. अंजली प्रशांत सुर्यवंशी, यशवंतराव चव्हाण (KMC) कॉलेज, कोल्हापूर.**

..............................................................................................................................................

**प्रस्तावना :-**

विश्वातील सर्व मानवांच्या हिताचा ध्यास घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाचा साकल्याने विचार करून नवमानवसमाज - निर्मितीचे दिव्य मानवतावादी दर्शन जगाला देणारा मानव महात्मा महात्मागांधीच्या रूपाने अवतरला मानवावर परिणाम करणाऱ्या सर्व प्रक्रियांचे त्याने सुक्ष्म अवलोकन केले. विविध महत्वपूर्ण प्रक्रियांमध्ये त्याने सक्रिय भाग घेतला. इतकेच नव्हेतर या प्रक्रियावर त्याने आपल्या विभूतिमत्वाचा ठसा उमटविला. मृग ले 'क्षेत्र धर्माचे असो, नीतीचे असो, राजकारणाचे असो, अर्थ- -कारणाचे असो वा समाजकारणाचे असो वैयक्तिक आत्मशांति- - पासून ते विश्वशांतीपर्यंत या महात्म्याची शेप होती. गावापासून ते विश्वापर्यंत त्यांच्या कार्यक्रमाचा आवाका होता आणि शांतिसाधक अहिंलेपासून ते कांतिकारक अहिंसपर्यंत त्याचे सत्याग्रहदूर्शन आजही आते मानवांचे आशास्थान बनून राहिले आहे.चरखा आणि स्वराज्य, अहिंला आणि क्रांति, साधुत्व आणि राजकारण आमभक्ति आणि रामभक्ति आत्मज्ञान आणि विज्ञान व्याति आणि समष्टि, मोस आणि सर्वोदय, असे परस्परविरोधी वाटणांच्या शब्दचा एकाच व्यक्तिमत्वामध्ये समन्वय हा अभूतपूर्व चमत्कार गांधीजीच्या रूपाने प्रथमच जगाने पाहिला. महात्मा राजकारण कसा? हा चमत्कार सर्वांन महत्वाचा आणि मानवहिताच्या दृष्टीने सर्वांत उद्बोधक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**उद्देश**

१.महात्मा गांधी यांची रामराज्याची संकल्पना समजावून घेणे

२.महात्मा गांधी यांचे लोकशाही विषयक विचारांची माहिती मिळविणे

३.महात्मा गांधी यांचा सत्याग्रह विषयक विचारांचा अभ्यास करणे

४.महात्मा गांधी यांच्या सत्यव अहिंसा संबंधी माहिती मिळविणे.

५.महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्य विषयक संकल्पनेचा अभ्यास करणे

६.महात्मा गांधी यांच्या राजकीय तत्वज्ञानाची अभ्यास करणे

७.महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याची कल्पना समजून घेणे.

८.महात्मा गांधीजीच्या सर्वोदय विषयक संकल्पना जाणून घेणे

**विषयाची माहिती :**'रामराज्य' या शब्दाचा धार्मिक परिभाषेत अनुवाद 'ईश्वराचे पृथ्वीवर राज्य' असा करता येईल. राजकीय परिभाषेत अनुवाद म्हणजे अशी, सर्वांगपरिपूर्ण लोकराणी की जिच्यात संपन्नता आणि दादिय, वर्ण, वंश पंथ किंवा स्त्री-पुरुष हे भेद मावळले आहेत. अशा राज्यान जमीन आणि राज्यसत्ता लोकांच्या हाती असते; न्याय त्वरित, निर्दोष आणि फार खर्च करावा न लागता मिळतो, आणि म्हणून अशा राज्यांत उपासनेचे भाषणाचे आणि वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य असते. असे राज्य सत्य आणि अहिंसा, यांवर आधारलेले असले पाहिजे आणि त्यांत समृद्ध, सुखी व स्वयंपूर्ण खडी आणि ग्रामसमाज असले पाहिजेत स्वराज्य, पूर्ण स्वराज्य किंवा स्वातंत्र्य याचा अर्थ आपल्यावर कोणत्याही परदेशी सत्तेचे राज्य नसणे. हे स्वातंय चहूबाजूचे असले पाहिजे. स्वातंयाची दुसरी बाजू म्हणजे राजकीय स्वातंत्र्ये. स्वराज्याची तिसरी बाजू नैतिक किंवा सामाजिक स्वातंय ही आहे चवथी बाजू व धर्म ही आहे. अशारीतीने चार कोन आपल्याला बरोबर सांभाळायचे आहेत. या चार काटकोनांचे बनलेले जे राज्य त्याला स्वराज्य म्हणा. मी त्याला रामराज्य म्हणेन.लोकशाहीची वृत्ति म्हणजे काही यांत्रिक वस्तू नव्हे की बाह्य आकार नष्ट केला की ती साधेल. त्यासाठी अंतःकरणांन पालट व्हावा लागतो. जर आपल्याला लोकशाहीची खरी वृली अंगी बाणवून घ्यायची असेलतर आपल्याला असहिष्णू राहून भागणार नाही. लोकशाहीमध्ये जो पुढारी असतो त्याने लोकांच्या प्रत्येक हाकेला तत्पर राहिले पाहिजे. जर आडदांड न्याय आपल्याला टाकायचा असेल आणि देशाची सुव्यवस्थित रीतीने प्रगती होत जावी अशी आपली इच्छा असेलतर जे स्वतःला लोकाचे नेते म्हणवतात त्यांनी लोक नेतील तसे त्यांच्या मागून जाण्याचे निश्चयपूर्वक नाकारले पाहिजे.

जे राष्ट्र आपला कारभार सरकारी सत्तेचा फारसा हस्तक्षेप होऊ न देता सुरकीतपणे आणि कार्यक्षम रीतीने चालविते तेचखरे लोकशाही असलेले राज होय सत्तेचा वाटा जोवर सर्वांना मिळत नाही तोवर लोकशाही ही अशक्य गोष्ट आहे. मात्र त्यामुळे लोकशाही भ्रष्ट होऊन कोलाहलशाहीत तिचे रूपांतर होऊ नये ज्या भंग्यामुळे किंवा मजुरामूळे आपला निर्वाह चालविणे आपल्याला शक्य होते त्यालाही स्वराज्याचा वाटा मिळाला पाहिजे असा लोकशाहीचा अर्थ आहे .जोपर्यंत सरकार तुमची प्रतिष्ठा रक्षण करते तोवरच त्याच्याशी सहकार करणे तुमचे कर्तव्य असते. परंतु सरकार जेव्हा रक्षणाऐवजी तुमच्या प्रतिष्ठेचा अपहार करते तेव्हा त्याच्याशी असहकार करणे हेही तितकेच कर्तव्य ठरते. 'यथा राजा तथा प्रजा' हे जिनके सत्य तितकेच 'यथा पूजा तथा राजा' हे सत्य आहे. कारण राजा हा जोपर्यंत त्याची सत्ता मानली जाते लोंबूरच राजा आहे. आपल्याला मान्य नसलेल्या कर्जाची भरपाई करण्याचे नाकारणे हाजर एखादया खाजगी व्यक्तीला हक्क आहे तर आपल्याला अन्याय्य वाटणारा कर देण्याचे नाकारण्याचा रयतेलाही तितकाच हक्क आहे. आत्मशक्तीचा सत्याग्रहाचा हा उपाय आपल्या ना सरकारच्या बाबतीत हानी होता येतो."धर्मात अर्थच्य कामस्य स धर्मः किं न सेव्यते." ज्या धर्माने लौकिक आणि आध्यात्मिक सुख प्राप्त होते तो धर्माचा राजमार्ग लोक काबरें अनुसरत नाहीत? 'धर्मा'चा अर्थ येथे फक्त बायाचार नाही, सत्य-अहिंसेचा मार्ग त्याने दर्शविला जातो त्या दिशेने पहिले पाऊल म्हणजे असत्य आणि हिंसा ही यापुढे आम्हाला निषिद्ध आहेत. त्याकरिता कोणताही त्याग आम्हाला करावा लागला तरी हरकत नाही. असा दृढ निश्चय करणे हे आहे. कारण असत्य - हिंसने जे काही चांगले साध्य झालेले दिसते ते फक्त दर्शनी चांगले असते प्रत्यक्षात ते मारप असते. आमच्या अहिंसेचा प्रारंभ आमची मुले वडील माणसे शेजारी- -पाजारी आणि मित्र असा घरापासून झाला पाहिजे. आमची अहिंबा बलवानाची नसली तरी चालेल, पण ती सत्य पाळणायाची असली पाहिजे. अहिंसा हा माझा धर्म आहे, माझ्या जीवनाचा प्राण आहे. आताही रचनात्मक शक्ति आहे, विनाशक नाही. ती लोकसला ती लोकसला स्थापणारी आहे. पण राजांना व संस्थानांना उलयन पाडणारी नाही.

गांधीजीच्या मनात सर्वोदय या विषयी विचाराचा जन्म रस्किन यांच्या प्रसिद्ध पुस्तक' Unto this Last' यामुळे झाला, या पुस्तकाचा उद्देश सर्वांचे कल्याण असा आहे. अशाप्रकारे गांधीजींनीही आपल्या जीवनात सर्वांचे कल्याण करण्याचा विचार म्हणजे सर्वोदय असा मांडला. म्हणजे संपूर्ण विश्व, सर्व वर्ग, जाती, देश. सर्वांसाठी हा विचार आहे. ग्रामस्वराज्य हे राज्यचे साध्य आहे. अहिंसा नव्हे हेमन मला सर्वस्वी मान्य आहे. स्वराज्याचे उदिदष्ट आम्हांला सुसंस्कृत बनविणे आणि आमची संकती शद करून तिला स्थिर पाया देणे हे नसेल तर त्या स्वराज्याची मातब्बरी ती काय? अहिलच्या मार्गाने स्वराज्य ही उलरोलर वाढत जाणाया शांतीतून झालेली कांती असली पाहिजे. म्हणजेच एखादया चांगल्या पोसलेल्या झाडावरून पूर्ण पिकलेले फळ जसे स्वाभाविक को गळून पडते तसे सत्तेचे हस्तांवर मूठभर राज्यकत्या मंडळीच्या हातांतून लोकांच्या प्रतिनिधीकडे सहज झाले पाहिजे. 'स्वराज्य' या शब्दावरून आपला स्वतःचा कारभार आपणच व्यवस्थितपणे चालविणे ही कल्पना व्यक्त होते. कॉंग्रेस ही आजवर लोकांच्या गाहाण्यांना वाचा फोडण्याकरिताअसलेले सर्वांत मोठे लक्षवेधक आणि प्रभावी साधन म्हणून झालेली आहे. ती लोकांच्या सबळपणाचा आणि दुर्बळपणाचा दोहोंचाही आरसा बनलेली आहे. मला स्वातंत्र्य सर्वांकरिता पाहिजे तसे स्वातंत्र्य अहिंलेतच असू शकते. जर आपल्याला आपले स्वातंत्र्य निव्वक अहिंसक साधनांनीच मिळवायचे असेल तरने फक्त चरख्याच्या मार्गानेच मिळू शकेल त्यांत अर्थात हिंदु-मुसलमान ऐक्य, अस्पृश्यता निवारण आणिश्तर अनेक गोही येतातच. खेडयातील लोकांना पोटाला देणारे काम पुरविणे, त्यांना त्यांची काही दुर्व्यसने टाकून द्यायला प्रवृत्त करणे आणि त्यांच्यांत एकराष्ट्रीत्वाची जाणीव निर्माण करणे होय

स्वातंत्र्य म्हणजे गुन्हेगारीचे स्वातंत्र्य नव्हे जेल स्वातंत्र्याचा हा अर्थ आहे की देशाच्या नेहमीच्या कायदयाच्या मर्यादित राहून कोणालाही आपल्या मर्जीप्रमाणे बोलण्याची व वागण्याची स्वतंत्रता आहे . पिन कोडांत आणि क्रिमिनल प्रोसीजर कोडोन परकीय राज्यकत्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेकरिता म्हणून घातलेल्या ज्या काही तरतुदी आहेत तर तरतुदी सहज ओळखून काढता येतील, त्यांचे उच्चाटन करणे अवश्य आहेस्वातंत्र्य याचा अर्थ आपल्यावर कोणत्याही परकी सलेचे राज्य नसणे हातर आहेच पण हे स्वातंत्र्य चहबाजूचे असले पाहिजे. त्यात

अर्थसिधा प्राप्त झाली पाहिजे. नैतिक, राजकीय, सामाजिक स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. भारताला स्वराज्य मिळायलाच हवे ही सर्व भारतीयांची मागणी आहे

**निष्कर्ष :-**

- महात्मा गांधी यांची रामराज्याची संकल्पना समजून घेतली.
- महात्मा गांधी यांचे लोकशाही विषयक विचारांची माहिती मिळाली.
- महात्मा गांधी यांचा सत्याग्रह विषयक विचारांचा अभ्यास केला
- महात्मा गांधी यांच्या सत्य व अहिंसा यासंबंधी माहिती मिळविली
- महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्य विषयक संकल्पनेचा अभ्यास केला.
- महात्मा गांधी यांच्या राजकीय तत्वज्ञानाचा अभ्यास केला.
- महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याची कल्पना समजून घेतली.
- महात्मा गांधीजींच्या सर्वोदय विषयक संकल्पना जाणून न घेतली

**संदर्भसूची:**

१.गांधी विचारदर्शन- राजकारण प्रकाशक - महाराज गांधी स्मारक निधि. गांधीभवन, कोथरूड, पुणे ४११०२९

२.बाळासाहेब भारदे , ‘सर्वोदयरस्किनची प्रसिद्ध साहित्यकृती अन्टू दिस लास्ट चा सारांश

मो. क. गांधी.. नवजीवन प्रकाशन मंदिर

३.लोकसत्ता वृत्तपत्र

४.साधना पत्रिका

५.समाजप्रबोधनी पत्रिका